सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

समन्वय कक्ष (माध्यम)
गणेशखिंड, पुणे

Media Co-ordination Cell
Ganeshkhind, Pune-7

११ नोव्हेंबर २०१९

# डेंग्यूचा उपद्रव रोखण्यासाठी विद्यापीठ आवारात
# १२ ते २६ नोव्हेंबर दरम्यान डास निर्मूलन व स्वच्छता मोहीम

पुणे -

पुणे शहरातील डेंग्यूच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्याचा प्रादूर्भाव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात होऊ नये यासाठी खबरदारीचा उपोय म्हणून प्रशासनाकडून १२ ते २६ नोव्हेंबर दरम्यान “डास निर्मूलन व स्वच्छता पंधरवडा” पाळला जाणार आहे. हा उपक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पुणे महानगरपालिकेच्या सहकार्याने राबवला जाणार आहे. त्या अंतर्गत विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

याबाबत आज विद्यापीठाचे अधिकारी व महापालिकेचे अधिकारी यांच्यात बैठक झाली. त्याला कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, पालिकेचे सहआयुक्त ज्ञानेश्वर मोळक, सहायक आयुक्त संदीप कदम, आरोग्य अधिकारी डॉ. संतोष मुळे व आरोग्य विभागातील अधिकारी तसेच, विद्यापीठाचे आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत दुधगावकर, डॉ. चेतना देशपांडे, कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी, विद्यापीठात स्वच्छतेचे काम करणारे बीव्हीजीचे अधिकारी, स्वच्छ संस्थेचे प्रचिनिधी, विद्यार्थी प्रतिनिधी हेही उपस्थित होते. त्यात या पंधरवड्यातील कामांचे नियोजन करण्यात आले.

कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी सांगितले की, शहरात व इतर भागात डेंग्याची साथ मोठ्या प्रमाणात पसरली आहे. त्याचा प्रादूर्भाव टाळण्यासाठी विद्यापीठाच्या आवारात विशेष मोहीम हाती घ्यावी, अशी सूचना मा. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केल्या

होत्या. त्यानुसार आजची बैठक झाली व उपाययोजना आखण्यात आल्या. त्याचाच भाग म्हणून विद्यापीठाच्या आवारात डास निर्मूलन व स्वच्छता पंधरावडा पाळला जाणार आहे. त्याअंतर्गत अनेक उपाययोजना केल्या जाणार आहेत. त्यात पुढील बाबींचा समावेश आहे-

- औषध फवारणी.
- धूरफवारणी (फॉगिंग).
- गवत व तण काढणे.
- साचलेल्या पाण्याचा निचरा करणे.
- गटारांची स्वच्छता, त्यांना झाकणे बसवणे.
- तळी तसेच, इतर नैसर्गिक जलस्रोतांमधील डासांची अंडी नष्ट व्हावीत म्हणून मासे (गप्पी) सोडणे.
- इमारतींची छते, सज्जे, अडगळीच्या जागा स्वच्छ करणे. तेथे साचलेल्या अडगळीची विल्हेवाट लावणे.
- साचलेली रद्दी व भंगार माल यांची विल्हेवाट लावणे.
- जनजागृतीसाठी पथनाट्ये बसवणे. पोस्टर्स व पत्रके तयार करणे.
- सर्व इमारतींची स्वच्छता करणे आणि पाणीविरहित दिन (ड्राय डे) पाळणे.

**विद्यार्थी, कर्मचारी, रहिवाशांचा सहभाग**

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी, कर्मचारी, संघटनांचे प्रतिनिधी, रहिवासी अशा सर्वांचा सहभाग घेण्यात येणार आहे. या दृष्टीने कर्मचारी व संघटनांच्या प्रतिनिधींची २५ पथके तयार करण्यात येणार आहेत. त्यांच्याद्वारे संपूर्ण आवाराचे सर्वेक्षण करण्यात येईल व तृटी दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्याचबरोबर विद्यापीठ आवारात अ. शैक्षणिक विभाग, ब. प्रशासकीय विभाग, क. रहिवासी विभाग असे तीन गट करून त्यांच्यात स्वच्छता स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहितीही डॉ. पवार यांनी दिली.

---

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
sppumediacell@gmail.com